अपर पोलीस महासंचालक (वाहतुक),
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरीता,
मोती महल, ६ वा मजला, १९५, जे. टाटा मार्ग,
सी.सी.आय. क्लब जवळ, सम्राट रेस्टॉरंट समोर,
चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०

दुरध्वनी क्र. :(०२२)- २२८२ ०३११
E-mail : adg.traffic.hsp@mahapolice.gov.in

जा.क्र. अपोमसं (वा.)/४५/नियोजन/ई-चलान/ई चलान परिपत्रक/२०२४/ ३५५९ / मुंबई

दि. /१२/२०२४ 11 DEC 2024

# परिपत्रक

**विषय:- ई चलान केसेसची कारवाई करताना दंड वसूली व वाहन जप्ती करण्याकरीता अनुसरावयाची आदर्श कार्यप्रणाली (Standard Operating Procedure)**

संपुर्ण महाराष्ट्र राज्यात ई-चलान प्रकल्प हा सन २०१९ पासून महाराष्ट्र पोलीसांमार्फत राबविण्यात येत आहे. कसुरदार वाहन चालक यांचे विरूध्द शासनाव्दारे पुरविण्यात आलेल्या ई-चलान उपकरणांद्वारे मोटार वाहन कायदा १९८८ व केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९च्या तरतुदींमधील उल्लंघनापोटी तडजोडपात्र (Compoundable) तसेच विना-तडजोडपात्र (Non-Compoundable) स्वरुपातील केसेस दाखल करण्यात येतात. ई चलान कारवाई दरम्यान दंड वसूली व वाहन जप्ती करण्याकरीता खालीलप्रमाणे आदर्श कार्यप्रणाली अनुसरावयाची आहे.

तडजोडपात्र ई चलान केसेसमधील उल्लंघनकर्ता हे जर स्वखुशीने तडजोड रक्कम भरण्यास तयार झाले तर त्यांचेकडुन शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम पोलीस अधिकारी / पोलीस अंमलदार यांनी तडजोड रक्कम (Composition Fee) शासनाचे नियमाप्रमाणे स्विकारुन ई चलान केसचा निपटारा करावा. परंतु उल्लंघनकर्ता हे तडजोड रक्कम भरण्यास स्वेच्छेने तयार नसतील, अशा प्रकरणी विहित पद्धतीने संबंधित अधिकार क्षेत्रातील मा. न्यायालयात दोषारोपपत्र (खटला) दाखल करावा. मात्र, विना-तडजोडपात्र ई चलान केसेसमधील उल्लंघनकर्ते यांचेविरुध्द विनाविलंब दोषारोपपत्र (खटले) मा. न्यायालयात दाखल करावे.

खटला दाखल केल्यावर जो उल्लंघनकर्ता खटल्याचे कामकाजाच्या वेळी मा. न्यायालयात उपस्थित राहण्याचे टाळेल, अशा उल्लंघनकर्त्याचे वाहन जप्त करण्याची परवानगी मिळण्याची मागणी मा. न्यायालयास करावी व अशी परवानगी मिळाल्याशिवाय वाहन जप्तीबाबतची कार्यवाही करण्यात येवु नये.

परंतु, सार्वजनिक ठिकाणी वाहन चालविण्यासाठी वाहन चालकाकडे परिवहन प्राधिकरण यांचेमार्फत दिलेला विहित चालक परवाना, वाहन नोंदणी प्रमाणपत्र तसेच विशिष्ट प्रयोजनासाठी वापरात येणा-या वाहनाच्या चालकाकडे परमिट, परवाना व प्रमाणपत्र सोबत बाळगणे बंधनकारक राहिल. तसेच चालकाची वयोमर्यादी ही १८ वर्षे व मालवाहतुकीचे वाहनावरील चालकाची वयोमर्यादा ही २० वर्षे पुर्ण असावी. यात कसुर करताना कोणी आढळुन आल्यास कसुरदाराचे ताब्यातील वाहन जागीच विहित रितीने पोलीसांना ताब्यात घेता येईल.

वरील प्रमाणे दिलेल्या दिशा निर्देशांचे न चुकता पालन करावे. यात कसुर करणा-यांविरुध्द संबंधित घटक प्रमुख यांनी शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

**सदरचे परिपत्रक हे बृहन्मुंबईसह संपुर्ण महाराष्ट्र राज्यात लागु करण्यात येत आहे.** सर्व घटक प्रमुखांनी सदर परिपत्रकाची प्रसिध्दी त्यांचे कार्यक्षेत्रात सोशल मिडियाच्या माध्यमातुन करावी.

11/12

(डॉ.सुरेश कुमार मेकला)
अपर पोलीस महासंचालक (वाहतुक),
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत माहितीकरीता सविनय सादर :
मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.

**प्रत माहिती व कार्यवाहीकरीता :**
सर्व पोलीस आयुक्त, व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग व महामार्ग सहित) महाराष्ट्र राज्य.

Scanned with OKEN Scanner